# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२

E-mail : dte.desk 4@gmail.com web : http://www.dte.org.in


पूरक परिपत्रक

क्रमांक :- ४-४अ/आस्था/२०१५/२७३

दिनांक :- 16 JUL 2015

विषय :- एम.ई./ एम.टेक./ पीएच.डी. हे उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी प्रतिनियुक्ती / अध्ययन रजा मंजूरीसाठीची संचालनालय स्तरावर धोरण निश्चिती ...

संदर्भ :- संचालनालयाचे क्र.४-४अ/आस्था/२०१५/९३, दि.१६.०५.२०१५ चे परिपत्रक

तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे दि.१६.०५.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकातील बाबीच्या आकलनाच्या संदर्भात काही अध्यापकांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने खालील बाबी स्पष्ट करण्यात येत आहेत.

१. सध्या अध्यापकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याने तूर्तास ३ अध्यापकांची मर्यादा घालून दिलेली असली तरी भविष्यात अध्यापकांची रिक्त पदे भरल्यानंतर प्रतिनियुक्ती / अध्ययन रजा यासाठी अध्यापकांच्या मर्यादेमध्ये वाढ करण्याबाबत विचार केला जाईल.

२. गोपनीय अहवालाची प्रतवारी ही मागील ५ वर्षांची "अ" ऐवजी ३ वर्षांची "अ" व २ वर्षांची "ब +" असा बदल करण्यात येत आहे.

३. पीएच.डी. अभ्यासक्रम कमाल ६ ऐवजी ५ वर्षात पूर्ण करणे आवश्यक राहील असा बदल प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

४. एकाच वेळी दोन पूर्णवेळ बाबींसाठी जसे - संस्थेमध्ये पदाचे पूर्णवेळ कामकाज आणि त्याचवेळी कामकाजाच्या वेळेतच एम.ई./ एम.टेक./एम.फार्म./पीएच.डी. इत्यादीचे काम एकाच वेळी करण्यास परवानगी देणे शक्य नसल्याने अभ्यासक्रमाची वेळ ही संध्याकाळी ५.३० नंतर किंवा सुट्टीच्या दिवशी असण्याचे व प्रवासासाठी लागणारा वेळ विचारात घेता अंतराचे (अंतर ३० कि.मी. ऐवजी ६० कि.मी. वाचावे) बंधन घालण्यात आलेले आहे.

५. मानवी कार्यक्षमता विचारात घेता संस्थेत पूर्णवेळ कामकाज केल्यानंतर त्याच दिवशी दूरवरील संस्थेत जाऊन अर्धवेळ एम.ई./एम.टेक./एम.फार्म./पीएच.डी.चे कामकाज करणे शक्य नसल्याने अर्धवेळ अभ्यासक्रमासाठी कार्यरत संस्थेपासूनच्या अंतराची मर्यादा ६० कि.मी. पर्यंत ठेवण्यात आलेली आहे.

६. स्वखर्चाने, विनावेतन रजा अथवा संबंधितांच्या खाती असलेल्या रजा घेऊन पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी अथवा पीएच.डी. करावयाची असल्यास मूळ परिपत्रकातील निकष लागू पडत नाहीत.

७. नामांकित संस्थेमधून (जसे आय.आय.टी., इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, एन.आय.आय.टी इत्यादी ) उच्च शिक्षण प्राप्त करावयाचे असल्यास मूळ परिपत्रकाच्या निकषानुसार फक्त प्राधान्यक्रम ठरविला जाणार आहे. त्यामुळे अन्य संस्थांमधील प्रस्तावांचा सुध्दा तद्नंतरच्या प्राधान्याने विचार केला जाणार आहे.

८. सध्या महाविद्यालयामध्ये सेवाप्रवेश नियमातच सहाय्यक प्राध्यापक पदासाठी एम.ई./एम.फार्म तर सहयोगी प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. अनिवार्य असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध होत आहेत, ही बाब विचारात घेता आणि संस्थेत पर्याप्त शिक्षक उपलब्ध असावेत या उद्देशाने एका विद्याशाखेतून एकाच वेळी एका अध्यापकांना पुरस्कृत करण्याचे धोरण तूर्तास अवलंबिले आहे.

परिपत्रकातील निकषानुसार छाननी करुन शिफारशीसाठी संचालनालयाचे स्तरावर फक्त प्राधान्यक्रम ठरविला जाणार असून अंतीम निर्णय शासन स्तरावर घेतला जाणार आहे.

तरी दि.१६.०५.२०१५ च्या परिपत्रका संदर्भात उपरोक्त सुधारीत स्पष्टीकरण विचारात घेऊन अध्यापकाकडून प्राप्त होणा-या प्रस्तावांची संस्था स्तरावर छाननी करुन दरवर्षी ३० सप्टेंबर पर्यंत प्रस्ताव विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात यावेत.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
२. सर्व प्राचार्य, शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.